प्रकअ /७७
२०१९-२०

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक

क्र. एमओएम/२०७० दि.३०.03.2020

विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनेदरम्यान कार्यालयात/कर्तव्यावर उपस्थित असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचा-यांना अदा करावयाच्या भत्त्याबाबत.

संदर्भ:- 1) परिपत्रक क्र.एमओएम/2005 दि.18.03.2020
2) परिपत्रकक्र.एमओएम/2012 दि.20.03.2020
3) परिपत्रकक्र.एमओएम/2086 दि.23.03.2020

कोरोना विषाणूंचा (Covid-19) प्रसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाते प्रमुख/विभाग कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाते प्रमुख/विभाग कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी ह्यांना, त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील लोकल सेवा बंद असल्यामुळे अत्यावश्यक सेवेतील सर्व कामगार / कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी येणे जाणे याकरीता व दैनंदिन जेवण खाणे इत्यादींचा भत्ता म्हणून प्रत्येकी रु. 300/- याप्रमाणे दि.23.03.2020 पासून ते दि. 31.03.2020 पर्यत संबंधित खात्याच्या अग्रधनातून अदा करण्यास व सदर कालावधी आवश्यकतेनुसार वाढविणेबाबत मा. महानगरपालिका आयुक्त यांनी दि. 23.03.2020 रोजी मान्यता दिली होती. याबाबत सर्व संबंधितांना त्याच दिवशी महापालिकेच्या संकेतस्थळाद्वारे अवगत करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

1) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाते प्रमुख/विभाग कार्यालयांतील अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. (उदा. सुरक्षा, अग्निशमन, घनकचरा व्यवस्थापन, जल, आरोग्य, धुलाई केंद्र इत्यादी खाती तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रिय कर्मचारी) तसेच अत्यावश्यक सेवेशिवाय कार्यालयीन कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहण्याचे सुद्धा आदेशित करण्यात आले आहे. (उदा. शासनाकडून/ बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वेळोवेळी प्रसारित होणा-या परिपत्रकाची अंमलबजावणी करणे, वर नमूद केल्याप्रमाणे भत्त्याचे अधिदान करणे, महानगरपालिकेतील कर्मचा-यांची वेतन आकारणी करणे व इतर तातडीच्या कामाची अंमलबजावणी करणे, इत्यादी). करोना विषाणूचा मोठ्या प्रमाणात होत असलेल्या प्रादुर्भावाचा विचार न करता, महानगरपालिकेतील अत्यावश्यक व अत्यावश्यक सेवेशिवाय इतर कामगार/ कर्मचारी, त्यांच्या जिवाची तमा न बाळगता, जोखिम पत्करून कामावर हजर राहून त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडीत आहेत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना (लिपिक व तत्सम संवर्गातील व लिपिक संवर्गापेक्षा निम्न

D:\25% attendence.odt

Scanned by CamScanner

संवर्गातील सर्व चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांना) यांना दैनंदिन भत्ता उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे रुपये 300/- प्रति कर्मचारी याप्रमाणे अनुज्ञेय राहील. त्याच प्रमाणे कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजने दरम्यान प्रत्यक्ष कर्तव्यावर उपस्थित असलेल्या आरोग्य सेवेतील परिचारिका तसेच निम वैद्यकीय कर्मचारी (पॅरामेडिकल), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्रमुख रुग्णालये व कार्यकारी आरोग्य अधिकारी हयांच्या अधिपत्याखालील सर्व डॉक्टर यांना देखील दैनंदिन भत्ता रु. 300 प्रति कर्मचारी अनुज्ञेय राहिल.

2) प्रमुख लेखापाल (वित्त) यांनी, खातेप्रमुख / विभाग कार्यालय यांच्या मागणीनुसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने, त्यांना आवश्यक असलेली उचल तातडीने उपलब्ध करून द्यावी आणि संबंधित खात्याने सदर दैनंदिन भत्त्याचे अधिदान उपस्थित कर्मचा-यांना त्वरित करावे.

3) उपरोक्त आदेश दि. 23.03.2020 पासून दि. 14.04.2020 पर्यत अंमलात राहतील.

वरील परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

30/3/2020
प्रमुख कर्मचारी अधिकारी
30/03/2020
30/3/20

30/3/2020
सह आयुक्त(सा.प्र.)

अति. आयुक्त(शहर)

मनपा आयुक्त

Scanned by CamScanner